I.O. करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कर्जत **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0142 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/03/2022 20:16 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 03/03/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/03/2022

**Time From (वेळेपासून):** 13:09 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/03/2022 **Time (वेळ):** 20:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/03/2022 20:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपअधीक्षक भूमिअभिलेख ,कार्यालय,कर्जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** कर्जत

**District(State) (जिल्हा(राज्य)):** अहमदनगर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लालासाहेब विठोबा शेटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1964 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंबी जळगाव ता कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आंबी जळगाव ता कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल ि परू नागरे | | | 1. हल्ली रा.भैलुमे चाळ,कुळधरण रोड, कर्जत,,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | कमलाकर वसंत पवार | | | 1. फ्लट नं 58, षाहुनगर,,राजेंद्रनगर, षारदा मंगल,कार्यालयाषेजारी, केडगाव, अहमदन,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिदि.03/03/2022मी लालासाहेब विठोबा शेटे, वय-58 वर्षे, धंदा सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, रा. आंबी जळगाव ता.कर्जत, जि. अहमदनगर. समक्ष फिर्याद देतो की, मी वरिल पत्यावर कुटंूबासह राहण्यास असुन मी दि.02/03/2022 रोजी कर्जत येथे सुरक्षित ठिकाणी समक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री. षरद गोर्डे यांना दोन षासकिय पंचासमक्ष लोकसेवकांविरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन माही जळगाव ता. कर्जत शिवारामध्ये सर्वे नं. 130 मध्ये माझी पत्नी नामे उषा लालासाहेब शेटे हिचे नावे 143 आर जमीन आहे. तसेच सदर सर्वे नंबरमध्ये 1) श्री. निलेश शेवाळे 2) श्री. भैरवनाथ शेटे व इतर अशांची प्रत्येकी 143 आर जमीन आहे. सदर सव्र्हे नंबरमधील जमिनीचे वरीलप्रमाणे सम समान तीन हिस्से करून घेण्यासाठी व हदद खुणा कायम करून घेण्यासाठी भूमि अभिलेख कार्यालय, कर्जत येथुन आम्हास सागितल्याप्रमाणे माझी पत्नी व इतर त्या सव्र्हे नंबरमधील हिस्सेदार अशांनी दिनांक 20/12/2021 रोजी भूमि अभिलेख कार्यालय, कर्जत येथे हिस्से फोड करण्यासाठी अर्ज करून शासकिय फी ची रक्कम भरलेली आहे. त्यानुसार दिनांक 10/01/2022 रोजी सदर सव्र्हे नंबरची रीतसर मोजणी झाली आहे. त्यामध्ये वहिवाट प्रमाणे जमिनीचे क्षेत्र कमी जास्त असण्याची शक्यता असल्याने आम्ही सर्व खातेदारांनी पुन्हा दिनांक 08/02/2022 रोजी दिनांक 02/09/1995 रोजी मोजणी करून तयार असलेल्या नकाशाप्रमाणे आमच्या सदर सव्र्हे नंबरमधील जमीनीचे 143 आर प्रमाणे सम समान तीन हिस्से फोड करून हदद दाखवावी यासाठी अर्ज दिला आहे. त्यानंतर दिनांक 17/02/2022 सबंधित मोजणी अधिकारी श्री. पवार व श्री. नागरे यांना भूमिअभिलेख कार्यालयात जावुन भेटलो असता त्या ठिकाणी नागरे यांनी पवार यांना त्यांच्या केबिनमध्ये बोलावुन माझी ओळख करून देवुन पवार यांना म्हणाले की, शेटे साहेबांचे हददी खुणा दाखविण्याचे काम करून दया, तुमचं काय आहे ते सांगा. त्यावेळी पवार मला म्हणाले की, या कामाकरीता तुम्ही मला शासकिय शुल्क व्यतिरीक्त 25,000/- रूपये दयावे लागतील. ते पंचवीस हजार रूपये तुम्ही नागरे यांचेकडे दया, मी तुमच्या हदद खुणा दाखवुन देईल. ते असे म्हणाल्यामुळे माझे असे लक्षात आले की, त्यांनी माझ्याकडे पंचवीस हजार रूपये लाचेच्या रकमेची मागणी केली आहे. त्यांना मी लाच दिली नाहीतर ते माझे काम करणार नाहीत. सदरची लाचेची रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नाही. पवार, नागरे यांचेत व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार नाही, तसेच कोणताही वैरभाव नाही. माझ्या सदर कामाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी माझे मित्र भिमराव निकत यांना सोबत घेवुन पवार व नागरे यांची भेट घेणार आहे. आज रोजी मला त्यांनी सदर लाच रक्कम घेवुन बोलाविले आहे. त्याप्रमाणे मी आज रोजी त्यांची भेट

घेवुन माझे कामाबाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चे दरम्यान त्यांनी माझ्याकडे लाच मागणी केल्यास त्यांचेविरूध्द आपले विभागामार्फत कारवाई होणेस विनंती आहे. अषी तक्रार दिली. माझ्या हातास कंप येत असल्याने माझी तक्रार माझे सांगणेप्रमाणे ला.प्र.विभागातील पोना चैधरी यांनी लिहिली. सदर तक्रारीवर मी सही केली व त्यानंतर दोन्ही पंच व पोनि गोर्डे यांनी सहया केल्या. त्यानंतर मी नागरे व पवार यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकार्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे पोका पांढरे यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकार्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकार्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोका पांढरे यांनी व्हाईस रेकार्डर चालु करून त्यामध्ये पोनि गोर्डे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोका पांढरे यांनी हाईस रेकार्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोनि गोर्डे यानी मला व माझे सहकारी श्री.निकत यांना पंच न 1 यांचेसह माझे सहकारी निकत यांचे चारचाकी वाहनाने रवाना केले त्याप्रमाणे रवाना होवुन मी नागरे व पवार यांची उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, कर्जत येथे भेट घेतली असता नागरे व पवार या दोघांनी माझी पत्नी व इतर दोन यांचे नावे असलेल्या जमिनीची मोजणी नुसार तिन्ही खातेदार यांचे पोट हिस्से करून हद्दीच्या खुणा दर्षविने करीता लोकसेवक नागरे व पवार यांनी 25,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 20,000/-रु.स्विकारण्याचे मान्य करून सदरची रक्कम पवार यांनी नागरे यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी पंच नं. 1 व माझे सहकारी निकत यांचेसह रवाना केले त्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. पोनि गोर्डे यांनी पच नं.1 यांना पंच नं. 2 समक्ष विचारणा करून आणि माझेत व नागरे आणि पवार यांचेत समक्ष भेटीत ध्वनिमुद्रित झालेले संभाषण ऐकुन नागरे आणि पवार यांनी माझेकडे लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम पवार यांनी नागरे यांचेकडे देण्यास सांगितले असल्याची स्पशटपणे खात्री झाली. त्याप्रमाणे नागरे यांचेविरूध्द उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कर्जत येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या 20,000/-रुपये नोटांना अन्थ्रासिन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन मला व दोन्ही पंचांना आणि सापळा पथकाला पोनि गोर्डे यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोका पांढरे यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून व्हाईस रेकार्डर चालु करून तो माझे ताब्यात देवुन मला व माझे सहकारी श्री.निकत यांना पंच नं. 1 यांचेसह माझे सहकारी निकत यांचे चारचाकी वाहनाने रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि गोर्डे, पंच नं. 2 व सापळा पथक षासकिय वाहनाने उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कर्जत जवळ येवुन आजुबाजुस कोणास संषय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबुन राहिले. मी, माझे सहकारी श्री.निकत व पंच 1 असे सदर कार्यालयासमोर गेलो असता सदरचे कार्यालय बंद असल्याचे दिसुन आले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. पोनि गोर्डे यांनी मला व पंच नं. 1 यांना घडलेल्या हकीकतीविशयी विचारले असता आम्ही सदरचे कार्यालय बंद झाले असल्याचे सांगितले. त्यानंतर सर्वानुमते लोकसेवक नागरे यांचेविरूध्द दि. 03/03/2022 रोजी लाचेचा सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी मला व माझे सहकारी श्री.निकत याना सदर घटनेबाबत गोपनियता ठेवण्याबाबत योग्य त्या सुचना देवुन दि.03/03/2022 रोजी कर्जत येथील सुरक्षित ठिकाणी 11.00 वा. येवुन थांबण्यास सांगुन जाण्यास मोकळीक दिली. आज दि. 03/03/2022 रोजी मी व माझे सहकारी श्री.निकत असे कर्जत येथील सुरक्षित ठिकाणी थांबलो असता पोनि गोर्डे हे सापळा पथक व दोन पंचासह आले. पोनि गोर्डे यांनी पोलीस उपअधीक्षक, श्री.खेडकर, ला.प्र.वि.अहमदनगर व त्यांचेसोबतचे सापळा पथकातील कर्मचारी यांचेषी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरून पोना चैधरी यांनी अ.पा.लावुन सिलबंद करून ठेवलेल्या लाचेच्या नोटा लिफाफयातुन बाहेर काढुन त्यांची तपासणी करण्यात आली. सदरच्या नोटा पोना चैधरी यांनी माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला व माझे सहकारी निकत आणि पंच नं. 1 यांना सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या सर्व सुचना पुन्हा समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे पोका पांढरे यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून व्हाईस रेकार्डर चालु करून तो माझे ताब्यात देवुन मला व माझे सहकारी श्री.निकत यांना पंच नं. 1 यांचेसह माझे सहकारी निकत यांचे चारचाकी वाहनाने रवाना केले व आमचे पाठोपाठ पो.उपअधी.श्री.खेडकर, पोनि गोर्डे, पंच नं. 2 व सापळा पथक षासकिय वाहनाने उपअधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालय, कर्जत जवळ येवुन आजुबाजुस कोणास संषय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबुन राहिले. मी, माझे सहकारी निकत व पंच नं. 1 अषांनी उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, कर्जत येथे जावुन नागरे व पवार यांची भेट घेवुन मी माझे कामाबाबत पवार व नागरे यांचेषी चर्चा केली. त्यावेळी नागरे व पवार यांनी माझेकडे मागणी केलेली 20,000/-रुपये लाचेची रक्कम पवार यांचे सांगणेवरून नागरे यांनी माझेकडुन स्विकारून ती रक्कम त्यांचे समोरील टेबलाचे उजव्या बाजुच्या वरच्या ड्रावहर मध्ये ठेवली. त्यावेळी मी पोनि श्री.गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकास लाच स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजित ईषारा केला असता सापळा पथकाने त्यांना 13.09 वा.चे सुमारास रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी नागरे यांना पवार कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यानी पवार हे षेजारील कक्षात असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी सापळा पथकाच्या मदतीने पवार यांना ताब्यात घेवुन नागरे यांना पकडलेल्या कक्षात हजर केले. सदरची लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. त्यानंतर पुढील आवश्यक त्या तपासण्या करून पंचनाम्याचे पुढील कामकाज षासकिय विश्रामगृह, कर्जत जि.अहमदनगर येथे करण्याचे ठरले. त्याप्रमाणे मी व माझे सहकारी निकत आमचेकडील चारचाकी वाहनाने व सापळा पथक नागरे व पवार यांचेसह शासकिय वाहनाने षासकिय विश्रामगृह कर्जत येथे आलो व त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज करण्यात आले. पोनि श्री.गोर्डे यांनी माझी फिर्याद नोंदवुन घेतली. तरी यातील लोकसेवक 1) सुनिल झिपरू नागरे व 2) कमलाकर वसंत पवार यांनी माझी पत्नी व इतर दोन यांचे नावे असलेल्या जमिनीची मोजणी नुसार तिन्ही खातेदार यांचे पोट हिस्से करून हद्दीच्या खुणा दर्षविने करीता 25,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 20,000/-रु.लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम लोकसेवक पवार यांचे सांगणेवरून लोकसेवक नागरे यांनी दिनांक 03/03/2022 रोजी 13/09 वा.चे सुमारास उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, कर्जत येथे आयोजित सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन स्विकारून स्वतःचा सं◌पत्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेवक 1) सुनिल झिपरू नागरे, वय 48 वर्शे, धंदा नोकरी, मुख्यालय सहायक वर्ग-3, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कर्जत, जि. अहमदनगर, सध्या रा. भैलुमे चाळ, षिवपार्वती मंगल कार्यालय, कुळधरण रोड, कर्जत, जि.अहमदनगर, मुळ रा.फ्लट नं. 10, साईतृशणा सोसायटी, लोकमान्य नगर, नाषिक रोड, नाषिक व 2) कमलाकर वसंत पवार वय 52 वर्शे, धंदा नोकरी, भूकरमापक वर्ग-3, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, ता.कर्जत जि.अहमदनगर, रा. फ्लट नं. 58, षाहुनगर, राजेंद्रनगर, षारदा मंगल कार्यालयाषेजारी, केडगाव, अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम/ हाती घेतले): chandrashekhar mohankrao yadav(I (Inspector)) **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):
3/3/22

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): chandrashekhar mohankrao
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
कर्जत पोलीस स्टेशन अ.नगर